AAP
AAM AADMI PARTY

## करसंकलन विभागात 29 कोटींचा गैरव्यवहार?

e Paper

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | रविवार दिनांक 28/09/२०२5 | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 227 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# राज्यातील लाखो लोकांपर्यंत 4जी तंत्रज्ञान पोहोचणार

## पंतप्रधानांच्या हस्ते बीएसएनएलच्या स्वदेशी निर्मित ‘4जी’ सेवेचे लोकार्पण




- मुख्यमंत्री

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आत्मनिर्भर भारत योजनेंतर्गत संपूर्ण स्वदेशी बनावटीच्या ‘4G ’ तंत्रज्ञानाधारित सेवेचे लोकार्पण झारसुगुडा ओडिशा येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे झाले. याअंतर्गत बीएसएनएलच्या 92 हजार 633 टॉवर्सचे लोकार्पण झाले असून, यापैकी 9 हजार 30 टॉवर्स महाराष्ट्रात उभारले गेले आहेत. या माध्यमातून देशातील तसेच राज्यातील लाखो लोकांपर्यंत 4जी तंत्रज्ञान पोहोचणार असून महाराष्ट्र शासनाच्या अकराशे ऑनलाईन सेवा गावागावात पोहोचण्यात या कनेक्टिव्हिटीचा फायदा होणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते ‘4G ’ नेटवर्कच्या दूरदृष्य प्रणालीद्वारे लोकार्पणानिमित्त साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे सांस्कृतिक कला मंदिर येरवडा येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. याप्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय युवक कार्य व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, भारती एअरटेलचे संस्थापक अध्यक्ष सुनील मित्तल, खासदार मेधा कुलकर्णी, बीएसएनएलचे मुख्य महाव्यवस्थापक हरिंदर कुमार, दूरसंचार विभागाचे विशेष महासंचालक आर. के. गोयल उपस्थित होते.मुख्यमंत्री म्हणाले, महाराष्ट्रात राज्य शासनाकडून नागरिकांना दिल्या जाणाऱ्या अकराशे सेवा ऑनलाईन आणि व्हॉट्सअॅपवर उपलब्ध करून देण्यात येत आहेत. यातील 90 टक्के सेवा एन्ड टू एन्ड डिजिटल करण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांना बसल्या जागी त्याच्या अर्जाची माहिती मिळणार आहे. सेवा हमी कायद्याची अंमलबजावणी खऱ्या अर्थाने करण्यात येत आहे. नागरिकांना आपल्या मोबाईलवरून सेवा उपलब्ध करून देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. यासाठी कनेक्टिव्हिटी असणे आवश्यक आहे. गावोगावी भारतनेटच्या माध्यमातून फायबर सेवा उपलब्ध करून देण्यात येत असल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना धन्यवाद दिले आणि बीएसएनएलचे अभिनंदन केले.बीएसएनएलच्या 92 हजार 633 टॉवर्सचे लोकार्पण होणे ही आनंदाची बाब असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, यातील 9 हजार 30 टॉवर्स महाराष्ट्रातील आहे. देशातील 24 हजार 680 हजार गावांना या टावर्सच्या माध्यमातून ‘4जी’ नेटवर्क उपलब्ध होणार आहे. देशाला विकसित करण्यासाठी परस्पर दळणवळण (कम्युनिकेशन) महत्त्वाचे आहे. 21 व्या शतकाच्या सुरुवातीला तत्कालीन पंतप्रधान स्व. अटलबिहारी वाजपेयी यांनी विकासाचा मार्ग हा दळणवळण असल्याचे म्हटले होते. त्यांनी दळणवळणाच्या दृष्टीने देशाला आणि गावांना रस्त्यांच्या माध्यमातून जोडण्यासाठी सुवर्ण चतुष्कोन योजना आणि पंतप्रधान ग्राम सडक योजना सुरू केल्या. आता 21 व्या शतकात विकासासाठी केवळ रस्तेच नाही तर कनेक्टिव्हिटी महत्त्वाची असल्याचे लक्षात आले. मोबाईल कनेक्टीव्हिटी आणि इंटरनेट गावात पोहोचविल्याशिवाय या शतकातील विकास गावापर्यंत पोहोचविता येत नाही. त्यामुळे गावागावात हे तंत्रज्ञान पोहोचविण्यासाठी 4जी टॉवर्सची निर्मिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात झाली.

# परभणी जिल्ह्यात पूरस्थिती कायम!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत





परभणी : जिल्ह्यात रात्रीपासूनच पावसाचा जोर कायम असून शनिवारी दिनांक 27 सकाळपासूनच पावसाची संततधार सुरू आहे. अद्यापही शिवारातले पाणी कमी होताना दिसत नाही तोच नदी नाल्यांना पूर आला आहे. जिल्ह्यात गंगाखेड-पालम या रस्त्यावरील वाहतूक पुरामुळे बंद झाली असून चुडावा येथे पुराचे पाणी असल्याने नांदेडकडे जाणारा मार्ग बंद झाला आहे. जिल्ह्यातील अनेक ठिकाणची अंतर्गत वाहतूक ठप्प झाली आहे.गळाटी नदीला आलेल्या पुरामुळे गंगाखेड पालम तसेच गंगाखेड राणीसावरगाव रस्ता बंद झालेला असून गंगाखेड, पूर्णा, पालम या तीनही तालुक्यांमध्ये पूरस्थिती गंभीर आहे. पोलीस ठाणे चुडावा हद्दीत पूर्णा ते नांदेड रोडवर चुडावा गावाजवळ पाणी वाहत असल्याने वाहतूक बंद केलेली आहे. योग्य बंदोबस्त लावण्यात आलेला आहे. चुडावा येथे पाण्याच्या टाकीवर एक व्यक्ती पुराच्या पाण्याने वेढलेला आहे.नगरपालिका महसूल व पोलीस पथक पूर्णा तालुक्यातील सदर व्यक्तीला रेस्क्यू करण्यासाठी प्रयत्न करत असल्याची माहिती प्रशासनाच्या वतीने देण्यात आली.नाव्हा पालम तालुक्यातील नाव्हा व पालम शहरातील काही व्यक्तींना घरात पाणी गेल्यामुळे सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित केले असून तालुक्यातील शेख राजुर येथे पुराच्या पाण्यामध्ये दोन व्यक्ती अडकलेल्या आहेत. या व्यक्तींना रेस्क्यू करण्याचा प्रयत्न सुरू आहे. चुडावा येथे पुरात अडकलेल्या व्यक्तीला बाहेर सुखरूप काढण्यात आले असून शेख राजुर येथे शेतात अडकलेल्या दोन व्यक्तींना पुरातून सुखरूप बाहेर काढून नदीच्या पलीकडील भागात सुरक्षित अंतरावर ठेवले आहे. पालम तालुक्यातील गुळखंड जवळा येथे पुराचे पाणी गावात आले आहे लोकांना सुरक्षित स्थळी हलवले

# हॅकेथॉन मध्ये विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नव संकल्पना कौतुकास्पद - डॉ. पंडित विद्यासागर

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : हॅकेथॉन सारख्या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांना समाजातील वास्तविक समस्यांवर नाविन्यपूर्ण उपाय सुचविणे आणि त्यांचे प्रभावी सादरीकरण करण्याची संधी मिळत असते. पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) येथे स्मार्ट इंडिया इंटरनल हॅकेथॉन सारख्या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नव संकल्पना कौतुकास्पद आहेत. हे विद्यार्थी समाजातील गंभीर आव्हानांना उत्तर देण्यासाठी नाविन्यपूर्ण उपाय शोधतील आणि भारताच्या प्रगतीत योगदान देतील, असे गौरवोद्गार नियामक मंडळ सदस्य डॉ. पंडित विद्यासागर यांनी काढले.पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट च्या साते वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ येथे "स्मार्ट इंडिया इंटरनल हॅकथॉन २०२५" आयोजित करण्यात आल्या होत्या. शिक्षण मंत्रालयाच्या इनोव्हेशन सेल च्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांमधील नाविन्य व समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करण्याच्या राष्ट्रीय उपक्रमाचा एक भाग म्हणून या स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये १०१ संघांनी नोंदणी केली होती, त्यापैकी ६७ संघांची इंटरनल प्रेझेंटेशन फेरीसाठी निवड झाली. काटेकोर मूल्यमापनानंतर ४५ संघांची अंतिम निवड करण्यात आली तर ५ संघ प्रतीक्षा यादीत ठेवण्यात आले.उद्योग - शैक्षणिक संबंध संस्था संचालक डॉ. प्रणव चरखा, अधिष्ठाता डॉ. विजय पाटील आणि डॉ. सागर पांडे यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी पीसीईटी चे कार्यकारी संचालक, पीसीयू चे कुलगुरू डॉ. गोविंद कुलकर्णी, प्रभारी उप कुलगुरू डॉ. संदीप थेपडे व विविध विभाग प्रमुख उपस्थित होते.डॉ. अनिकेत कुलकर्णी, अमेय तांबे (टेक्नो सॅम, पुणे), डॉ. सागर शिंदे, डॉ. उमा पाटील आणि डॉ. संजीवकुमार अंगडी (नूतन महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजी) यांनी परीक्षक म्हणून काम केले. अंकुश दहात यांनी समन्वयक जबाबदारी पार पाडली.इनसाईट हब क्लब सदस्य, विद्यार्थी स्वयंसेवक, प्रशासनिक कर्मचारी तसेच मार्केटिंग व डिझाईन टीम यांनी आयोजनात सहभाग घेतला.

पीसीयूचे कुलपती हर्षवर्धन पाटील, पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, उद्योजक अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे आणि कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

# ज्येष्ठ संगीतकार ओ.पी.नय्यर यांना आदरांजली

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पुणे : ज्येष्ठ संगीतकार ओंकार प्रसाद नय्यर ऊर्फ ओ.पी. नय्यर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त श्री गणेश कला क्रीडा रंगमंच येथे ३१ व्या पुणे नवरात्रौ महोत्सवात ओ.पी. नय्यर यांची अजरामर गाणी सादर करून त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. १९५०-६० या दशकात ओ.पी. नय्यर यांनी हिंदी चित्रपट गीतांचे सुवर्णयुग निर्माण केले. अतिशय वेगवान व लयबद्धन गाणी हे त्यांचे वैशिष्टे होते अशा भावना व्यक्त करीत ओ.पी. नय्यर यांनी संगीत दिलेली काही निवडक गाणी रसिकांसमोर सादर करण्यात आली. त्यांच्या तैलचित्रास पुष्पहार अर्पण करून संयोजक आबा बागुल व गायकांनी कृतज्ञता व्यक्त केली. त्यांचे सुप्रसिध्द "मांग के साथ तुम्हारा..." आणि " ये चांद सा रोशन चेहरा" ही गाणी गायिका पल्लवी पत्की ढोले आणि गायक रफि हबीब यांनी गायिली तेव्हा प्रेक्षकांनी 'वन्समोअर'चा नारा देत टाळ्यांचा कडकडात केला.यानंतर 'म्युझिकल मास्टर्स' हा कार्यक्रम संपन्न झाला. 'म्युझिकल मास्टर्स' या कार्यक्रमाची निर्मिती संकल्पना संजय हिवराळे आणि पल्लवी पत्की-ढोले यांची होती. या कार्यक्रमाच्या माध्यमातून नामांकित संगीतकार लक्ष्मीकांत प्यारेलाल आणि राहुल देव बर्मन यांनी संगीतबद्ध केलेली लोकप्रिय गाणी कार्यक्रमात सादर करण्यात आली. यावेळी गायक रफी हबीब, विनोद कुमार, आकाश सोळंकी, भाग्यश्री डुंबरे कोरस स्वरनव्य यांनी विविध गाणी सुरेल संगीताच्या माध्यमातून सादर करत रसिकांची मने जिंकली.कार्यक्रमाची सुरुवात म्युझिकल वादनाने झाली. त्यानंतर 'है नाम रे..', "एक लडकी को देखा तो..', 'दर्द-ए-दिल..', 'सोला बरस की..' अशी अजरामर झालेली गाणी गाण्यात आली. पल्लवी पत्की यांनी गायलेल्या 'प्यार करने वाले' गाण्याला तर रसिकांनी वन्समोअर म्हणत कलाकार आणि वादकांचा उत्साह आणखी वाढवला. 'गुलाबी आँखें..' या सॅक्सोफोनवरील गाण्याचे शब्द ऐकून प्रेक्षकांनी देखील गाणे एकत्रित रित्या गुणगुण्यास सुरुवात केली. त्यानंतर जल्लोषपूर्ण उत्साहात 'हवा हवाई..', 'इलू..इलू..', 'जो तुम चाहे जहाँ..', 'जुम्मा चुम्मा दे दे..' या एकामागूनएक गाण्यांनी तर रसिकांमध्ये उत्साह भरून ते सभागृहात खुर्चीवरुन उठून चक्क हात हवेत उंचावून नाचू लागत टाळ्यांनी कलाकरांना साथ देत होते. या संपूर्ण कार्यक्रमाचे निवेदन प्रा. महेश अचिंतलवार यांनी करत कार्यक्रमात रंगत आणली. गायक आणि गायिकांना या कार्यक्रमा दरम्यान वादक मिहिर भदकामकर, अमृता ठाकूर-देसाई, अभिजीत भदे, संजय हिरवळे, विलास रायकर, सचिन वाघमारे, महेंद्र कुमार,अंकुश बोरडे, संकेत देहाडे, रोहित साने यांनी उत्कृष्ट साथ दिली.याप्रसंगी जयश्री बागुल, किशोर सरपोतदार, नरेंद्र बिरार,अनिल टाकळकर, अनिल बिरार, घनश्याम सावंत , लक्ष्मण आरडे, रमेश भंडारी, नंदकुमार बानगुडे, नंदकुमार कोंढाळकर, अमित बागुल, सागर बागुल उपस्थित होते.यावेळी कार्यक्रमात उद्योग क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शीतल कोरे यांचा यावेळी पुणे नवरात्रौ महोत्सवाचे आयोजक अध्यक्ष आबा बागुल यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

# करसंकलन विभागात 29 कोटींचा गैरव्यवहार?

## आम आदमी पार्टीची चौकशी व कारवाईची मागणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

महानगरपालिकेच्या करसंकलन विभागामध्ये ठेकेदारांकडून मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. तब्बल सहा हजार फाईल्समध्ये बनावट कागदपत्रे सादर करून २९ कोटी रुपयांचे बिल दाखल करण्यात आले असल्याचा आरोप होत आहे. या संदर्भात बिल अदा करण्याची प्रक्रिया सुरू झाल्याचे वृत्त बाहेर आल्यानंतर नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.या गंभीर प्रकरणाकडे लक्ष वेधत आम आदमी पार्टी पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष रविराज बबन काळे यांनी आयुक्तांकडे ईमेलद्वारे निवेदन सादर केले. त्यांनी सांगितले की, “महानगरपालिकेच्या निधीचा गैरवापर होणे म्हणजे नागरिकांच्या विश्वासाला तडा जाणे होय. ठेकेदारांना २९ कोटी रुपयांचे बिल अदा करणे ही जनतेच्या पैशांची थट्टा आहे. आम्ही तातडीने चौकशीची मागणी करत असून, अन्यथा रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशारा देतो.

**”रविराज काळे यांनी प्रशासनासमोर तीन ठोस मागण्या मांडल्या आहेत –**

1. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्यासाठी त्रिसदस्यीय चौकशी समिती नेमावी.

2. चौकशी पूर्ण होईपर्यंत ठेकेदाराला कोणतेही बिल अदा करू नये.

3. चौकशीचा संपूर्ण अहवाल जनतेसमोर पारदर्शकपणे प्रसिद्ध करावा.काळे यांनी पुढे म्हटले की, “महानगरपालिकेतील आर्थिक पारदर्शकता ढासळू देणार नाही.

नागरिकांच्या पैशांचा अपव्यय हा विश्वासघात असून, आम आदमी पार्टी त्याविरोधात ठाम भूमिका घेईल.”

# श्री भगवान गडावर दसरा मेळावा साठी पिंपरी मधून जाणार हजारो नागरिक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री भगवान गडावर दसरा मेळावा साजरा करण्यासाठी पिंपरी चिंचवड शहरातून गतवर्षी प्रमाणे या वर्षी देखील हजारो नागरिक जाणार असल्याची माहिती प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे यांनी दिली.

शुक्रवारी चिंचवड येथे श्री भगवान गडावर जाणाऱ्या प्रतिनिधींची बैठक आयोजित करण्यात आली होती.या बैठकीस माजी उपमहापौर



केशव घोळवे, माजी नगरसेविका योगिता नागरगोजे, रघुनंदन घुले, माजी स्वीकृत सदस्य ॲड. मोरेश्वर शेडगे तसेच ज्ञानेश्वर नागरगोजे, गणेश ढाकणे, कैलास सानप, सचिन थोरवे, शुभम पालवे, भागवत खेडकर, सुभाष दराडे, दीपक नागरगोजे, भागवत मुंडे, भाऊसाहेब कुटे, आण्णासाहेब गरजे, विजय सानप, संजय बडे, विनोद मुंडे, गजानन सोनूने, हनुमंत घुगे, रामदास कावळे, सचिन सानप आदी उपस्थित होते.

या नंतर माध्यम प्रतिनिधीशी बोलताना सदाशिव खाडे यांनी सांगितले की, सावरगाव, तालुका पाटोदा, जिल्हा बीड येथील श्री संत भगवान बाबा यांचे गडावरील स्थळ हे बहुजन समाजाचे श्रद्धास्थान आहे. या गडावर दरवर्षी दसऱ्याच्या दिवशी लाखोंच्या संख्येने बहुजन समाजातील बंधू, भगिनी तसेच वारकरी व धार्मिक, सांप्रदायिक क्षेत्रातील भाविक उपस्थित राहत असतात.

यावर्षी पिंपरी चिंचवड शहरातून देखील पाच हजार नागरिक उपस्थित राहणार आहेत अशी माहिती समन्वयक सदाशिव खाडे यांनी दिली.

# पिंपरीत स्वच्छतेचा जागर ; आयुक्त शेखर सिंह यांचा सहभाग

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या "स्वच्छता ही सेवा" अभियानांतर्गत पिंपरीत आज भव्य स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. पिंपरी मंडई परिसरात झालेल्या या मोहिमेत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह सहभागी झाले होते.या मोहिमेत तब्बल ३५० हून अधिक नागरिकांनी स्वच्छतेची शपथ घेत उत्साहाने सहभाग नोंदविला. नागरिकांशी संवाद साधताना आयुक्त शेखर सिंह यांनी "स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५ मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने देशात सातवे तर महाराष्ट्रात पहिले स्थान मिळवले आहे. आगामी सर्वेक्षणात देशात अव्वल क्रमांक पटकावण्यासाठी आपण सर्वांनी मिळून सामूहिक प्रयत्न करणे आवश्यक आहे, यासाठी महानगरपालिका पूर्णपणे कटिबद्ध आहे."असे सांगितलेस्वच्छतेच्या मोहिमेदरम्यान आयुक्त शेखर सिंह यांनी सफाई सेवक महिला, व्यापारी आणि नागरिकांशी देखील संवाद साधला. सफाई सेवकांमुळे पिंपरी चिंचवड शहर स्वच्छ राहत असून,सफाई सेवकांचे योगदान बहुमोल आहे.यावेळी बोलताना आरोग्य विभाग प्रमुख उप आयुक्त सचिन पवार म्हणाले शहर स्वच्छतेची आपली सामूहिक जबाबदारी असून, स्वच्छता सेवकांच्या मेहनतीला समाजाने योग्य आदर दिला पाहिजे,नागरिकांनीही स्वच्छतेच्या मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला पाहिजे असेही ते म्हणाले."आम्ही अशी शपथ घेतो की, आम्ही स्वतः स्वच्छतेच्या प्रति जागरूक राहू आणि त्यासाठी वेळही देऊ. दरवर्षी १०० तास म्हणजे प्रत्येक आठवड्यातून दोन तास श्रमदान करून स्वच्छतेच्या या संकल्पाला पूर्ण करू. आम्ही स्वतः घाण करणार नाही, आणि दुसऱ्यालाही घाण करू देणार नाही. सर्वप्रथम आम्ही स्वतःपासून, आमच्या कुटुंबापासून, आमच्या गल्ली/वस्तीपासून आमच्या गावापासून तसेच आमच्या कार्यस्थळापासून या कामास सुरुवात करू. आम्हाला हे मान्य आहे की, जगामधील जे देश स्वच्छ आहेत, त्याचे कारण त्या ठिकाणचे नागरिक स्वतः घाण करीत नाहीत व घाण करूनही देत नाहीत. या विचारांनी आम्ही गावोगावी आणि गल्लोगल्ली स्वच्छ भारत मिशनचा प्रचार करू. आम्ही आज शपथ घेत आहोत, ती आणखी १०० लोकांकडूनही करवून घेऊ. ते पण आमच्यासारखे स्वच्छतेसाठी १०० तास देतील यासाठी आम्ही प्रयत्न करू. आम्हाला माहिती आहे की, स्वच्छतेच्या दिशेने टाकलेले आमचे एक पाऊल संपूर्ण भारत देशाला स्वच्छ करण्यासाठी मदत करील"... अशी शपथ यावेळी स्वच्छता मोहिमेत सहभागी झालेल्यांना देण्यात आली. जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी उपस्थितांना ही शपथ दिली.या मोहीमेची सुरुवात शगुन चौकातून झाली. त्यानंतर डिलक्स चौक, पिंपरी कॅम्प, रेल्वे स्टेशन आणि साई चौक या भागात स्वच्छता उपक्रम पार पडला.




प्रत्येक ठिकाणी नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोहिमेला चालना दिली. यावेळी प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर न करण्याबाबत जनजागृती करण्यात आली तसेच आरोग्य विभाग आणि ओंजळ संस्थेच्या सहकार्याने व्यापाऱ्यांना पर्यावरणपूरक कापडी पिशव्यांचे वाटपही करण्यात आले.कार्यक्रमाला पिंपरी चिंचवड महानगरपालिका आरोग्य विभाग प्रमुख, उप आयुक्त सचिन पवार, अ क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सहाय्यक आरोग्य अधिकारी राजू साबळे, कुंडलिक दरवडे, मुख्य आरोग्य निरीक्षक दत्तात्रय गणगे, आरोग्य निरीक्षक विकास शिंदे, स्नेहा चांदणे, कुणाल सगर, लक्ष्मण साळवे, धनेश्वर थोरवे, गणेश राजगे, गोपाळ धस, स्वच्छतादूत पवन शर्मा, पिंपरी मंडईचे अध्यक्ष भरत जगताप, संतोष वडमारे, गौतम रोकडे महापालिका अधिकारी कर्मचारी आदी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या स्वच्छता मोहिमेत ७६२ किलो कचरा संकलीत करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपआयुक्त सचिन पवार यांनी केले तर सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

# सिंबायोसिस सेंटर फॉर डिस्टन्स लर्निंग मध्ये सरस्वती पूजन उत्साहात

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे - सिंबायोसिस सेंटर फॉर डिस्टन्स लर्निंग (SCDL), मॉडेल कॉलनी येथे नवरात्री निमित्त सरस्वती पूजन मोठ्या उत्साहात पार पडले. सिंबायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी (एसएसपीयू) चे कुलपती डॉ. एस.बी. मुजुमदार आणि प्र-कुलपती डॉ. स्वाती मुजुमदार यांच्या हस्ते सरस्वती मातेचे पूजन मोठ्या भक्ती भावाने करण्यात आले.



दरवर्षीप्रमाणे यंदाही साईबाबांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.या वेळी संजीवनी मुजुमदार, मेंबर, सिंबायोसिस ओपन एजुकेशन सोसाइटी; डॉ. विद्या येरवडेकर, प्रधान संचालक, प्रो चांसलर, सिंबायोसिस इंटरनॅशनल; सोनाली कदम, उपसंचालक, एससीडीएल; आशिष निमगिरे, रजिस्ट्रार, एसओईएस; शरद पुलाटे, रजिस्ट्रार, एसएसपीयू; मनीष भारद्वाज,सैन्य आणि संरक्षण संशोधन आणि विकास संघटना (DRDO); ग्रॅव्हिटस फाउंडेशनच्या उषा काकडे तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते.

त्याच बरोबर सिंबायोसिस ओपन एजुकेशन सोसाइटी मधील प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षेकेतर कर्मचारी यांचा सहभाग उल्लेखनीय होता.

या दिवशी सिंबायोसिस स्किल्स युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थिनींनी देवी स्तोत्र पठण व नृत्य सादरीकरण केले.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 9657409579